दैनिक **अक्षराज**
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आतील पानात वाचा**

- दोन वर्षांपासून शेतरस्ता बंद; शेतकऱ्यांची मशागत–पेरणी खोळंबली...
- शिळ–डायघर पोलिसांची दमदार कामगिरी
- तिसऱ्या श्रावणी सोमवारी, ढोकेश्वरला भाविकांची मांदियाळी...

**|| आजचा सुविचार ||**

रोजच्या प्रार्थनेत शब्द नसतील
तरीही चालेल, पण हृदय हवे.
हृदयाशिवाय आलेले शब्द मात्र नकोत.
– महात्मा गांधी

वर्ष : ०६ | अंक : १८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०१ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# फुटबॉलच्या देवाचा मैदानाला अलविदा! जगभरातील चाहत्यांना धक्का

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, मुंबई :** फुटबॉलचा जादूगार आणि देव मानला जाणारा लिओनेल मेस्सी याने आंतरराष्ट्रीय फुटबॉलला अखेर अलविदा केला आहे. त्याने हा निर्णय घेतल्यानंतर चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. जुलैमध्येच अर्जेंटिनाला सलग दुसऱ्यांदा विश्वचषकाच्या फायनलमध्ये पोहोचवल्यानंतर त्याने आजरोजी सोमवारी निवृत्तीची घोषणा केली आहे. सध्या मेस्सी ३९ वर्षांचा आहे. मेस्सीने घेतलेल्या या निर्णयामुळे कोट्यवधी चाहत्यांचे डोळे पाणावले आहेत. दरम्यान, सोशल मीडिया पोस्टद्वारे आपल्या चाहत्यांना मेस्सीने ही माहिती दिली. या पोस्टमध्ये त्याने तब्बल तीन पानांमध्ये त्याने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. दरम्यान, आपल्या कारकीर्दीत अर्जेंटिनासाठी सर्वस्व पणाला लावल्याचेही त्याने पोस्टमध्ये म्हटले आहे.



**‘हा निर्णय घेताना खूप दुःख झालं’**

मेसीने आपल्या पोस्टमध्ये निवृत्तीचा निर्णय अत्यंत भावनिक असल्याचे सांगितले. हा निर्णय घेताना आपल्याला खूप दुःख झाले आणि अजूनही होत असल्याचे त्याने म्हटले आहे. मात्र, आता आंतरराष्ट्रीय फ ुटबॉलमधून बाजूला होण्याची हीच योग्य वेळ असल्याचे मेसीने स्पष्ट केले. मी नेहमीच माझं सर्वस्व दिलं आहे. केवळ गेल्या काही वर्षांत आम्ही जे काही जिंकलो त्यासाठीच नाही, तर त्याआधीही मी अर्जेंटिनाच्या जर्सीसाठी संघर्ष केला आणि सर्वस्व झोकून दिलं, असं मेस्सीने म्हटलं.

**मेस्सीची पोस्ट जशास तशी!**

फायनलला इतका वेळ उलटून गेल्यानंतर, खूप विचार केल्यानंतर मी सर्वांना सांगू इच्छितो की, मी अर्जेंटिना राष्ट्रीय संघातून निवृत्ती घेत आहे. हा निर्णय घेताना खूप वेदना झाल्या आणि आजही मनाला त्याची वेदना होत आहे. पण आता हीच योग्य वेळ आहे, हे मला समजत आहे. मी तुम्हाला शपथपूर्वक सांगतो की, मी नेहमीच माझं सर्वस्व दिलं. केवळ गेल्या काही वर्षांत, जेव्हा आपण सर्व काही जिंकलो, तेव्हाच नाही तर त्याआधीही मी या जर्सीसाठी, या संघासाठी नेहमीच सर्वस्व पणाला लावलं. तुम्हाला आनंद देण्यासाठी आणि फुटबॉलच्या माध्यम ातून अर्जेंटिनाचा नागरिक असल्याचा अभिमान वाटावा, यासाठी मी नेहमीच संघर्ष केला.

आता फार वेळ शिल्लक नाही आणि काही काही टप्पे संपत चालले आहेत. त्यापैकी हा एक टप्पा आहे, जो मला खूप त्रास देतोय. मला अर्जेंटिना संघाचा भाग असणं आवडत होतं, आजही आवडतं आणि कायम आवडत राहील. मी माझं सर्वस्व दिलं आहे. आता माझ्याकडे देण्यासाठी काहीच उरलेलं नाही. शिवाय, माझ्या मागे काही खूपच चांगले युवा खेळाडू आहेत, जे संघात स्थान मिळवण्यास पात्र आहेत.

गेल्या २० वर्षांपासून दिलेल्या प्रेम ासाठी तुम्हा सर्वांचे मनापासून आभार. मैदानाच्या आतून तुमचा आवाज ऐकण्याची मला खूप आठवण येईल. आता मी तुमच्यापैकीच एक असणार आहे. बाहेरून संघाला नेहमीच पाठिंबा देत राहीन, चांगल्या काळातही आणि वाईट काळात तर त्याहूनही जास्त.

माझ्या कुटुंबाचेही आभार. या सुंदर, पण तितक्याच कठीण प्रवासात त्यांनी नेहमी माझी साथ दिली आणि माझ्यासोबत राहिले. माझ्यासोबत काम केलेल्या प्रत्येक प्रशिक्षकाचे, सहकाऱ्यांचे आणि पदाधिकाऱ्यांचे आभार. त्यांच्यासोबत घालवलेल्या असंख्य आठवणी आणि अविस्मरणीय क्षण मी कायम माझ्यासोबत घेऊन जाईन.

माझ्या मनात आता एकच समाधान आणि अभिमान आहे की, माझ्या सहकाऱ्यांसोबत मिळून मी तुम्हाला काही स्वप्नवत क्षण अनुभवायला दिले. हे सर्व तुमच्यासोबत जगता आलं, हीच एक वेडी करणारी अनुभूती होती. तुम च्यावर माझं खूप प्रेम आहे.

देवा, तू मला अर्जेंटिनाचा नागरिक बनवलंस, यासाठी तुझे आभार.

चला, अर्जेंटिनासाठी लढूया!

ही पोस्ट मी २१ जुलै रोजी, फायनलच्या दोन दिवसांनंतर लिहिली होती. आता माझ्या वडिलांच्या निधनानंतर मी या निर्णयाबाबत पूर्वीपेक्षाही अधिक ठाम झालो आहे.

# मुलीची छेड काढणाऱ्या आरोपीला पोस्को अंतर्गत अटक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, चंद्रपूर :** शाळेत जात असलेल्या मुलीला एका बाईक चालकाने लिफ्ट देतो म्हणून गाडीवर बसविले आणि काही अंतरावर तिची छेड काढण्यास सुरुवात केली. या अचानक घडलेल्या घटनेने पिडीत मुलीने गाडीवरुन उडी मारली असता ती जखमी झाली. त्यानंतर बाईकस्वार घटनास्थळावरुन पळून गेला. सदर घटनेबाबत पोलिसात तक्रार केल्यानंतर पोलिसांनी २४ तासात आरोपीला बेड्या ठोकल्या. सदर घटना २९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजताच्या दरम्यान टेमुर्डा येथे घडली. गणेश बाळूराम कुमावत (३४) ह. मु. बोर्डा, ता. वरोरा व मुळ रहिवासी बासडी खुर्द, जि. जयपूर, राज्य राजस्थान असे आरोपीचे नाव आहे. सदर घटनेमध्ये आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन शेगाव येथे अप. क्र. २६५/२०२६ कलम ७४ बीएनएस सह कलम १२ बाल अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्यात शेगाव पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द कोणतीही माहिती नसताना. टेमुर्डा, वरोरा तसेच इतर ठिकाणी अज्ञात आरोपीचा शोध घेऊन व सर्व तांत्रिक बाबी तपासून व खबरी कडून माहिती घेऊन अत्यंत कौशल्य पूर्ण तपास करुन २४ तासाच्या आत आरोपीचा शोध लावून त्याला ताब्यात घेतले. आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेली टू व्हीलर गाडी जप्त करण्यात आली.


सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनकर ठोसरे सा. यांचे मार्गदर्शनात सपोनी योगेंद्रसिंग यादव ठाणेदार पेलीस स्टेशन शेगाव, पोउपनि दिलीप पोले, पोउपनि सुमित कांबळे, सफौ दिलीप सूर, पोहवा अविनाश तुराणकर, दिनेश ताटेवार, पोशी. प्रशांत गिरडकर यांनी केली.

# श्रावणी सोमवार, संकष्टी चतुर्थीनिमित्त श्री चिंतामणी मंदिरात भाविकांची गर्दी

## पहाटेपासून दर्शनासाठी रांगा; चंद्रोदयानंतर श्रींचा छबिना, भाविकांना महाप्रसाद

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, थेऊर (पुणे) :** श्रावणी सोमवार आणि संकष्टी चतुर्थीच्या पवित्र पर्वानिमित्त अष्टविनायक क्षेत्रातील श्रीक्षेत्र थेऊर येथील श्री चिंतामणी मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी पहाटेपासून मोठी गर्दी केली होती. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची वर्दळ वाढली होती. दिवसभर भक्तिमय वातावरणात श्रींच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. पहाटे श्री चिंताम णींचे वंशपरंपरागत हक्कदार पुजारी किर्तीराज शैलेंद्र आगलावे यांच्या



हस्ते श्री चिंतामणींची विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी चिंचवड देवस्थानच्या वतीने विश्वस्त केशवजी विद्वांस आणि विश्वस्त ॲड. विक्रम दौंडकर उपस्थित होते.

भाविकांची गैरसोय होऊ नये तसेच दर्शनाची व्यवस्था सुरळीत राहावी यासाठी देवस्थानच्या वतीने मंदिर प्रांगणात तसेच मंदिराबाहेर मांडव उभारण्यात आले होते. भाविकांसाठी दर्शनबारी आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. या सुविधांमुळे भाविकांना शिस्तबद्ध पद्धतीने श्रींचे दर्शन घेता आले.

संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने रात्री ८ वाजून ४६ मिनिटांनी चंद्रोदय झाल्यानंतर श्री चिंतामणींचा पारंपरिक छबिना काढण्यात आला. छबिन्याच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. ढोल–ताशांचा गजर, भक्तिगीते आणि ‘गणपती बाप्पा मोरया’ च्या जयघोषाने मंदिर परिसर भक्तिमय झाला होता.

छबिना सोहळ्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. श्री चिंतामणींचे दर्शन, छबिना सोहळा आणि म हाप्रसादाचा लाभ घेत भाविकांनी श्रावणी सोमवार व संकष्टी चतुर्थी भक्तिभावाने साजरी केली.

# कल्याण- अहिल्यानगर- लातूर जनकल्याण द्रुतगती महामार्ग

## ४५० किमीच्या महामार्गाच्या सरेखनाचा प्रस्ताव राज्य सरकारकडे सादर



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर :** कल्याण ते लातूर प्रवास केवळ पाच तासांत करता यावा, यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने ( एमएसआरडीसी) कल्याण ते लातूर असा जनकल्याण द्रुतगती महामार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या महामार्गाचे सरेखन निश्चित करून ते अंतिम करण्यासाठीचा प्रस्ताव नुकताच एसआरडीसीकडून राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे. त्यानुसार हा महामार्ग ४५० किमी लांबीचा असून त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाडा आणि मुंबईला जोडणाऱ्या प्रस्तावित कल्याण–लातूर जनकल्याण द्रुतगती महामार्गाच्या कामाला वेग आला आहे. या सहापदरी महामार्गामुळे नगर ते मुंबई प्रवासाचा वेळ कमालीचा घटणार आहे. हे अंतर अवघ्या तीन तासांवर येणार आहे.

सध्या या महामार्गाचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण युद्धपातळीवर सुरू आहे. टाकळी ढोकेश्वर, चास, जामगाव, पाडळीतर्फे कान्हूर आणि गोरेगाव परिसरातील प्रस्तावित मार्गाचा नकाशा समोर आल्याने स्थानिक नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

सुमारे ४५० किलोमीटर लांबीचा हा सहापदरी द्रुतगती महामार्ग उभारण्यासाठी ३५ ते ३६ हजार कोटी रुपयांचा निधी अपेक्षित आहे. गेल्या दीड महिन्यापासून या मार्गाचे ड्रोन सर्वेक्षण सुरू आहे. हे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर गावनिहाय जमिनींची निश्चिती करून प्रत्यक्ष जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया हाती घेतली जाईल. रस्त्याची एकूण लांबी ४५० किलोमीटर आहे. हा रस्ता सहापदरी द्रुत गती मार्ग आहे. त्यासाठी मार्ग अंदाजपत्रकीय खर्च ३५ ते ३६ हजार कोटी रुपये आहे. या प्रकल्पातील सर्वात महत्त्वाचा आणि आव्हानात्मक टप्पा म्हणजे माळशेज घाट परिसरातील आठ किलोमीटर लांबीचा बोगदा होय. या बोगद्यामुळे घाटातील धोकादायक वळणे आणि वाहतूक कोंडीतून प्रवाशांची कायमची सुटका होणार आहे. प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होण्यासाठी अजून १५ ते १८ महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हा महामार्ग केवळ प्रवासाचा वेळ वाचणार नाही, तर अहिल्यानगर आणि मराठवाड्याच्या आर्थिक चित्र पालटणारा ठरेल. चास आणि आसपासच्या परिसरात नवीन बाजारपेठ,लॉजिस्टिक पार्क्स, शेतमाल वाहतूकीच्या सोयी आणि नवीन उद्योग उभारणीला चालना मिळेल. त्यामुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. या महामार्गाच्या आजूबाजूच्या संपूर्ण परिसराचा विकास होणार असल्याचे सांगितले जाते.

# ऐन पावसाळ्यात जलस्रोत कोरडे, पिके तहाणलेली ; खरीपातील पिके धोक्यात

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर :** ऐन पावसाळ्यात जिल्ह्यात अनेक भागात सध्या छोटे–मोठे जलस्रोत कोरडे आणि खरीप हंगामातील पिके तहानलेली तर फुलोऱ्यात असलेल्या पिकांची गळ सुरू असल्याचे दिसत आहे. आज, उद्या पाऊस होईल आणि खरीप हंगामात पेरल्या पिकांना पाणी मिळाले यासाठी शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागलेल्या दिसत आहे. मात्र, गेल्या महिनाभरापासून पावसाचा मोठा खंड पडत असल्याने आता शेतकऱ्यांची चिंता वाढली असून आता पाऊस झाला तरी खरीप हंगाम ातील अनेक पिकांच्या उत्पन्नात घट येणार आहे.

गेल्या महिनाभरापासून पावसाअभावी बहरात आलेल्या खरीप हंगामातील पिकांना मोठा पाण्याचा ताण बसला असून, फुलोऱ्यात आलेल्या पिकांची फुले गळू लागली आहेत. शेतात उमललेली फुले गळताना केवळ उत्पादनाची आशाच नाही, तर बळिराजाने पाहिलेली स्वप्नेही डोळ्यांसमोर गळून पडत असल्याचे हृदयद्रावक चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. नगर दक्षिणेत अनेक ठिकाणी अद्याप जलस्रोत कोरडेठाक असून, पिण्याचे पाणी व चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे हा भाग दुष्काळाच्या उंबरठ्यावर आल्याचे चित्र दिसून येत आहे. यंदा हंगामाच्या पेरणीच्या सुरुवातीपासूनच पावसाने लपंडाव सुरू केल्याने तुरळक पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी सोयाबीन, बाजरी, तूर, मूग, तसेच चारा पिकांची पेरणी केली. सुरुवातीला झालेल्या रिमझिम पावसामुळे पिकांनी उभारी घेतली. सोयाबीन, मुगाला फुलोरा आला आणि शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या. फुलोऱ्यात आलेल्या पिकांना पाण्याची नितांत गरज असताना पाऊसच गायब झाल्याने फुले गळून पडत आहेत.



बाजरी, वाटाणा, सोयाबीन, तूर यांसह चारा पिकांनाही पावसाअभावी मोठा फटका बसला आहे. खरीप हंगामच अडचणीत सापडल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक गणितावर मोठा परिणाम होण्याची भीतीही व्यक्त केली आहे. खरीपच संकटात सापडल्याने रब्बीच्या आशाही मावळत चालल्या आहेत. त्यामुळे बळिराजाला मोठा दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. पेरणीपासून पावसाअभावी खरीप पिकांची हेळसांड झाली आहे. कर्ज काढून केलेली पेरणी अन् पिकांची झालेली दयनीय अवस्था शेतकऱ्यांचे कंबरडे मोडणार आहे.

आता पावसाने दडी मारल्याने पिकांची वाढ खुंटली आहे. अनेक ठिकाणी पाने सुकू लागली असून, फुलोरा टिकविण्यासाठी आवश्यक असलेला ओलावा जमिनीत राहिलेला नाही. शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने, खर्च करून आणि उधारी – उसनवारी करून उभी केलेली पिके आता डोळ्यांसमोर कोमजताना पाहण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. पावसाळ्याचे तीन महिने उलटत आले, तरी तालुक्यातील तलाव, बंधारे, नाले आणि नदी पात्रांमध्ये अद्याप पाण्याचा स्पर्शच झाला नाही. बहुतांश नद्या कोरड्याच असून, लहान मोठे जलसाठे पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. ऑगस्ट संपला, तरी अनेक गावांना अद्याप टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पावसाळ्यातही गावांची तहान टँकरवर भागवावी लागत असल्याने भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता स्पष्ट होत आहे. दमदार पावसाअभावी आगामी काळात पिण्याच्या पाण्यासह पशुधन,चाऱ्याचा प्रश्न आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे.

# मैथिली ठाकूर यांच्या भक्तिसुरांनी नाशिककर मंत्रमुग्ध

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३१, विंचूर (नाशिक) :** भक्ती, संगीत आणि भारतीय सांस्कृतिक परंपरांचा अनोखा संगम असलेल्या ‘कुंभ भक्ती संगम’ महोत्सवात सुप्रसिद्ध गायिका मैथिली ठाकूर यांच्या सुमधुर भक्तिगीतांनी नाशिककरांना मंत्रमुग्ध केले. नाशिक–त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या वतीने आयोजित या महोत्सवात मैथिली ठाकूर यांच्या दमदार आणि भावपूर्ण गायनाने संपूर्ण ठक्कर डोम परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

**मराठी अभंग ते लोकसंगीताची सुरेल मेजवानी**

कार्यक्रमाची सुरुवात भावपूर्ण नामसंकीर्तनाने झाली. मैथिली ठाकूर यांनी ‘जय जय विठ्ठल रखुमाई’, ‘कानडा राजा पंढरीचा’, ‘मनी नाही भाव देवा मला पाव’ आणि ‘माझे माहेर पंढरी’ या लोकप्रिय मराठी अभंगांचे सादरीकरण करून उपस्थितांना भक्तिरसात लीन केले. त्यानंतर ‘राम आएंगे तो अंगना सजाऊँगी’, ‘राम को देखकर श्री जनक नंदिनी’, ‘यशोमती मैय्या से बोले नंदलाला’ आणि ‘जगन्नाथ चका नैन’ यांसारख्या प्रसिद्ध भक्तिरचनांनी रसिकांना खिळवून ठेवले.

**सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश**

मैथिली, भोजपुरी आणि मराठी भक्तीपरंपरांचा सुरेल मिलाफ साधत त्यांनी भारतीय लोकसंगीताची समृद्ध विविधता प्रभावीपणे उलगडली. रामायणावर आधारित गीते, रामचरितम ानसातील दोहे आणि ‘राधिका गोरी से’ या रचनांना रसिकांकडून टाळ्यांच्या कडकडाटात भरभरून दाद मिळाली. ‘विविध भाषा, विविध परंपरा; मात्र भक्तिभाव एकच’ हा राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश त्यांनी आपल्या सादरीकरणातून दिला.




## पैठणी साडीवर बारकोड; अस्सलतेला मिळणार सरकारी संरक्षण!

महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेची आणि कलात्मक वारशाची ओळख असलेली पैठणी ही केवळ साडी नसून महाराष्ट्राच्या वस्त्रकलेचा अभिमान आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण रचना, आकर्षक रंगसंगती, जर व रेशमी विणकामामुळे पैठणीला देशभरात मोठी मागणी आहे. मात्र, या वाढत्या मागणीचा गैरफायदा घेत बाजारात बनावट, अर्धवट किंवा कमी दर्जाच्या साड्या 'पैठणी'च्या नावाखाली विकल्या जाण्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी पैठणीवर बारकोड आणि लोगो देण्याचा सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे.

खरी पैठणी तयार करण्यासाठी कारागिरांना मोठा वेळ, कौशल्य आणि मेहनत घ्यावी लागते. एका पैठणीच्या निर्मितीसाठी अनेक दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे अस्सल पैठणीची किंमतही तिच्या दर्जानुसार असते. परंतु ग्राहकाला खरी आणि बनावट पैठणी यातील फरक सहज ओळखता येत नसल्याने अनेकदा तो अधिक पैसे देऊनही निकृष्ट वस्तू खरेदी करतो. याचा थेट परिणाम ग्राहकांबरोबरच पारंपरिक पैठणी विणकरांवरही होतो.

बारकोड आणि अधिकृत लोगोमुळे ग्राहकाला साडीची अस्सलता तपासणे सुलभ होईल, तसेच बनावट पैठणी विकणाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे प्रशासनालाही शक्य होईल. या योजनेमुळे पैठणीच्या नावाचा गैरवापर रोखण्याबरोबरच महाराष्ट्राच्या पारंपरिक हस्तकलेला विश्वासार्ह बाजारपेठ मिळण्यास मदत होईल.

मात्र, केवळ बारकोड लावून प्रश्न सुटणार नाही. त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे, बारकोडची पडताळणी करणारी यंत्रणा सुलभ असणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच पैठणी विणकरांना आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठ, प्रशिक्षण आणि आर्थिक मदत उपलब्ध करून देणेही गरजेचे आहे.

ग्राहकांची फसवणूक रोखणे आणि कारागिरांच्या कष्टाला योग्य मोबदला मिळवून देणे, या दोन्ही उद्देशांनी हा निर्णय महत्त्वाचा ठरू शकतो. महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या पैठणीची ओळख, गुणवत्ता आणि परंपरा जपण्यासाठी सरकार, कारागीर, व्यापारी आणि ग्राहक यांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे. बारकोडमुळे पैठणीची केवळ ओळख पटू नये, तर तिच्या अस्सलतेवर ग्राहकांचा विश्वासही अधिक दृढ व्हावा, हीच अपेक्षा!

**– श्याम ठाणेदार**

# एमपीएससी पेपर फुटीसह इतर पेपर फुटीचे प्रकार आस्मानावर आणि, विद्यार्थ्यांच्या समस्या वाऱ्यावर; हे किती दिवस चालणार; विद्यार्थ्यांनी जगावे की मरावे!




देशासह राज्यातील पेपर फुटी प्रकरणामुळे तरुण युवकांपुढे मोठ्या गंभीर आणि जटिल समस्या निर्माण झाल्या असून सरकारने त्यांना द्विधा मनस्थितीत नेऊन ठेवले आहे.त्यामुळे देश कुठे चालला हे कळता-कळेना एवढी मोठी भयावह परिस्थिती सरकारने युवा पिढीच्या बाबतीत देशात निर्माण करून ठेवली आहे. त्यामुळे सरकार तुपाशी आणि बेरोजगार युवक उपाशी अशी गंभीर समस्या सरकारने निर्माण केली आहे.त्यामुळे युवकांपुढे एकीकडे विहिर तर दुसरीकडे खाईअशी परिस्थितीत निर्माण झाली आहे.

त्यामुळे जाये तो जाये कहा अशी भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे.राज्यातील एमपीएससी पेपर फुटीमुळे असह्य वेदना होत असुन नौकरीच्या बाबतीत तरूणांचा सरकारवरील विश्वास हळूहळू कमी होतांना दिसत आहे. कारण नीट,सीईटी, टीईटी, न्यायपालिकेतील टायपिंग स्किल परीक्षा, औषध निरीक्षक पदभर्ती पाठोपाठ आता एक्साईट चाही मार्किंग पॅटर्न आणि पेपर फुटीचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे.यावरून स्पष्ट होते की,राज्यात सर्वच स्तरावरील पेपर फुटीचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले असून सर्वत्र जनूकाय अंधकार निर्माण झाला की काय असे सर्वत्र वातावरण दिसत आहे.कारण पेपर फुटीमध्ये पेपर काढणारे व राजकीय पुढारी यांची सर्वांचीच मिलीभगत असल्याचे दिसून येते त्यामुळेच हा प्रकार होत असावा किंवा सरकारी नौकरी भरतीच्या नावाखाली तरूणांची सरकार दिशाभूल तर करीत नाही ना असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

राज्यात वारंवार होत असलेल्या पेपर फुटीचा किंवा नौकरी भरतीचा होत असलेला गोंधळ पहाता असे वाटते की, राज्यातील सरकारी नौकरी भरती ही सरकारचे नाटक तर नाही ना!वारंवार पेपर फुटीच्या प्रकरणावरून असे वाटते की, सरकारला सरकारी नौकऱ्यांच्या रीक्त जागा भरायच्या आहे की नाही यात राज्याच्या जनतेच्या मनात शंका निर्माण होत आहे.कारण राज्यासह देशात सत्तेसाठी पक्ष फुटतांना आपण अनेकदा पाहिले आणि हा प्रकार नेहमीच होत असतो.परंतु सध्या राज्यात सर्वच स्तरावरील पेपर वारंवार फुटत आहेत.

यामुळे विद्यार्थ्यांची मानसिकता खालावली असून त्यांच्या आयुष्यावर घणाघाती प्रहार होत आहे व अनेक जण डिप्रेशनमध्ये गेल्याचे दिसून येते.विद्यार्थांचा पेपर होतो पेपर चांगले जातात आणि नंतर अचानक पेपर फुटतो याला तर अजीबोगरीब कहानी म्हणावी लागेल.त्याचप्रमाणे हायकोर्टाच्या परिक्षेत ११५९२२ उमेदवार परीक्षा देतात त्यातून टायपिंग परीक्षेसाठी मेहनतीच्या बळावर राज्यात ११६१७ उमेदवार पात्र ठरतात आणि याही ठिकाणी सर्वच सेंटरवर मोठ्या प्रमाणात उमेदवार गोंधळतात यावरून स्पष्ट होते की, परीक्षा व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात तांत्रिक तृटी निर्माण होते व ज्यांना २० पैकी १० ते १५ मार्क मिळण्याची शक्यता असते त्यांना फक्त १ ते ५ मार्क मिळतात ही कसली परीक्षा पध्दत म्हणावी?हायकोर्टाच्या टायपिंग टेस्टच्या बाबतीत असेही सांगितले जाते की काही ठिकाणी टायपिंग टेस्टचा पेपर फुटल्याचे सांगितले जाते.अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी किंवा बेरोजगार तरुणांनी कोणावर विश्वास ठेवावा यावर सुद्धा सरकारच्या बाबतीत प्रश्न चिन्ह उपस्थित होतो.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बाबतीत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की,जाये तो जाये कहा अशी कठीण समस्या दिसून येते.एमपीएससी परीक्षा नेहमी पारदर्शी पद्धतीने व्हायची आणि त्यावर सर्वांचाच विश्वास होता.परंतु आता यातही मोठे भगदाड पडले असुन पेपरफुटी दिसून आली हे राज्याच्या विद्यार्थ्यांच्या व बेरोजगार तरुणांनांच्या दृष्टीने अत्यंत दुर्भाग्यपूर्ण व दुःखद बाब आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने खाद्य एवं औषधी प्रशासन विभाग यामध्ये औषधी निरीक्षक (डीआई) समूह -बी या पदाचा पेपर फुटल्याने औषधी निरीक्षक भर्ती प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगावर प्रश्न चिन्ह उपस्थित होत आहे.असे सांगितले जाते की, औषधी निरीक्षक भर्ती परीक्षेची प्रश्नपत्रिका राज्यभरात सक्रिय एजंट मार्फत उमेदवारांना ४०-४० लाख रूपयांत विकण्यात आल्याचे सांगितले जाते.

आज राज्यात सरकारी नौकरीच्या लाखो जागा खाली आहेत.परंतु सरकारची नियत साफ नसल्याचे पेपर फुटीचा घृणास्पद प्रकारावरून दिसून येते.हा सर्व प्रकार सरकार आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.परंतु गुन्हेगारांवर कठोर शिक्षा किंवा फाशी होत नाही हे राज्याचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.औषध निरीक्षक पाठोपाठ आता एक्साईज चाही मार्किंग पॅटर्न आणि पेपर फुटीचा खळबळजनक आरोप होत आहे.यावरून स्पष्ट होते की राज्यात नौकरी भरतीच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असुन सरकार फक्त चौकशीची भाषा किंवा समिती तयार करून हात झटकण्याचे काम करीत आहेत ही तरुण युवकांसाठी मोठी समस्या निर्माण झाली आहे.कारण राज्यात पेपर फुटीचे प्रकार दिवसेंदिवस वाढतच आहे;राज्यात पेपर फुटीवरून असे निदर्शनास येते की, सरकारला रीक्त पदे भरायचेच नाही की काय! असे दिसून येते.अशा परिस्थितीत योग्यता प्राप्त विद्यार्थ्यांचा यात नंबर लागणार की नाही हाही प्रश्नच आहे. वरील प्रकरणामुळे सरकारने विद्यार्थ्यांच्या भविष्यापूढे मोठे प्रश्न चिन्ह निर्माण केला आहे. कारण सध्याच्या परिस्थितीत सरकार देशातील आणि राज्यातील राजकारणात पक्ष फुटी,आमदार-खासदार फुटी यावर अवलंबून आहे.

त्याचीच पुनरावृत्ती सरकार पेपर फुटीच्या माध्यमातून तरूण विद्यार्थ्यांची व बेरोजगार युवकांची अवहेलना करून स्लोपॉयझनच देण्याचे काम सरकार करीत आहे.अशा गंभीर परिस्थिती अनेक बेरोजगार युवावर्ग डिप्रेशनमध्ये जाऊ शकतो यालाही नाकारता येत नाही. राज्यासह देशात जेन-झी व जेन अल्फां चे हालबेहाल होत आहे, तर दुसरीकडे सरकारने सुभाष चंद्रांना २२ हजार कोटींची कर्जमाफी जाहीर केल्याचे सांगितले जाते.यामुळे कर्ज देणारी एचडीएफसी बँक व एलआयसी सरकारवर आक्रमक झाल्याचे दिसून येते. हाच पैसा सरकारने शाळा महाविद्यालये किंवा आरोग्य सुविधांसाठी वापरला असता तर देशाचा विकास झाला असता.

अशाप्रकारे देशाचा अरबोखरबो रूपया पुंजीपतींच्या घश्यात सरकारने टाकुन देशातील युवकांपुढे गंभीर समस्या निर्माण केल्या आहेत.यावरून स्पष्ट होते की, देशाला भ्रष्टाचाराने सर्वत्र जखडले आहे याचे प्रायचित्य आज युवा पिढी पेपर फुटीच्या रूपात भोगत आहे.त्यामुळे पेपर फुटीचे ग्रहण केव्हा सुटणार याची चिंता आज सर्वांना लागली आहे. जय हिंद.

**– लेखक –**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.९९२१६९०७७९, नागपूर**

## जागृत युवा

जागृतहोय युवापिढी
अवचित ये प्रकाशात
सितारे चमत्कार दावे
बदल हो अवकाशात

बाहेर येई फुलपाखरे
दडपूनठेवली कोषांत
व्यापून टाके परिसरा
टण्कारती नवत्वेषात

स्वार्थीनेत्यांचे दाताड
घालतीत्यांच्या घशात
काही पक्ष सरसावले
घ्यावे त्यांस स्वपक्षात

ज्वालामुखीचीताकद
आताचं आली लक्षात
कधी ना दावला स्नेह
उमाळा आला वक्षात

वाफ असे शक्तीशाली
सामावूनघ्यावे कक्षात
दडपूनि टाका पुन्हांदा
डाव चालला प्रत्यक्षात

चांगले दिसता शोभून
बदलल्या पूर्ण वेशात
सांभाळू ठेवावे जोशा
स्वतः आखल्या रेषात

ओळखावे सुशिक्षीता
हीत अहीत ते कशात
जरूरी कणखर ध्वनी
डंका गाजे दशदिशात

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## श्री भेकराईमाता माध्यमिक विद्यालयात क्रीडा दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.३१, फुरसुंगी (पुणे) :** विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, संघभावना, शिस्त आणि नेतृत्वगुण विकसित व्हावेत, या उद्देशाने भारताचे महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंती व जागतिक क्रीडा दिनानिमित्त श्री भेकराईमाता माध्यमिक विद्यालय, भेकराईनगर, फुरसुंगी येथे क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने व क्रीडास्पर्धेच्या खिलाडूवृत्तीने सहभाग घेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. सामन्यांमधून विद्यार्थ्यांमधील कौशल्य, चपळता, संघभावना व आत्मविश्वास प्रकर्षाने दिसून आला.

या क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील दीक्षित यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापक मेमाणे पी. जी., पर्यवेक्षक सुधीर खोमणे तसेच सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडाशिक्षकअनिल चंद, नितीन कामठे, पवार ए.आर. आणि स्पोर्ट व्हिलेज फाउंडेशनच्या क्रीडाप्रशिक्षक मिस ज्योती बर्मन यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे चेअरमन सुजित रुकारी, मॅनेजिंग ट्रस्टी प्रवीणशेठ कामठे, सर्व ट्रस्टी यांनी विशेष मार्गदर्शन करून क्रीडा दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.



आजच्या डिजिटल युगात जिथे हा खेळ हे मोबाईल किंवा टीव्ही, कॉम्प्युटर स्क्रीन पुरते मर्यादित होत आहेत. तिथे मैदानी खेळांचे महत्त्व अधिकच वाढले आहे. खेळातून शरीर सुदृढ होते, मन प्रसन्न राहते आणि व्यक्तिमत्त्वाला आत्मविश्वासाची जोड मिळते म्हणून अभ्यास जितका महत्त्वाचा आहे तितकाच रोज किमान एक तास मैदानावर घाम गाळणे ही गरजेचे आहे. अभ्यास आणि खेळ याचा समतोल राखला पाहिजे, या विचाराला प्रत्यक्ष कृतीची जोड देणारा हा क्रीडा दिन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

## बेलापूरमध्ये कारचा भीषण अपघात जीवितहानी टळली !

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.३१, बेलापूर (नवी मुंबई) :** बेलापूर परिसरात भरधाव वेगातील कारचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार थेट ट्रॅफिक पोलीस चौकीच्या रेलिंगला धडकली. रेलिंग तोडून कार पुढे जाऊन जवळच असलेल्या एका खोलीच्या भिंतीवर आदळल्याने भिंतीचे मोठे नुकसान झाले. या अपघातात कारचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कार भरधाव वेगाने जात असताना चालकाचे अचानक वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर कारने ट्रॅफिक पोलीस चौकीची रेलिंग तोडत जवळच्या खोलीला जोरदार धडक दिली. धडकेमुळे खोलीची भिंत तुटली असून परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, कार तसेच संबंधित खोलीचे मोठे नुकसान झाले आहे.

या प्रकरणी ट्रॅफिक पोलिसांनी कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, चालकाचा वेग किती होता तसेच अन्य बाबींचा तपास सुरू आहे.

## दोन वर्षांपासून शेतरस्ता बंद ; केहाळ येथील शेतकऱ्यांचे तहसीलदारांकडे निवेदन

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.३१, जिंतूर :** मौजे केहाळ येथील गट नंबर १३६ मधून जाणारा जुना शेतरस्ता बंद झाल्याने शेतकऱ्यांना गेल्या दोन वर्षांपासून शेतीची मशागत व पेरणी करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे शेतीचे काम खोळंबले असून, गट नंबर १३६ मधून जुना शेतरस्ता तात्काळ खुला करून द्यावा, अशी मागणी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, केहाळ येथील रहिवाशांच्या शेतजमिनी गावातील शिवारात आहेत. शेतरस्ता उपलब्ध नसल्यामुळे मागील दोन वर्षांपासून शेतीची मशागत व पेरणीची कामे रखडली आहेत. पूर्वी या मार्गाने शेतीची कामे केली जात होती; मात्र गेल्या दोन वर्षांपासून गट नंबर १३६ मधील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी अडथळा निर्माण झाला आहे.विशेषतः कौशाबाई प्रल्हाद प्रधान यांच्या शेतरस्त्याला अडथळा निर्माण झाल्याने त्यांच्या शेतीची मशागत व पेरणी करता येत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी व निवेदने दिली असूनही अद्याप प्रश्न मार्गी लागलेला नाही.




वारंवार निवेदन देऊनही दोन वर्षे उलटली, मात्र अद्याप आम्हाला न्याय मिळालेला नाही. गट नंबर १३६ मधून जुना शेतरस्ता खुला करून शेतकऱ्यांना शेतीसाठी मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.या मागणीसाठी उत्तम धोंडिबा गायकवाड, माणिक धोंडिबा गायकवाड आणि उद्धव धोंडिबा गायकवाड यांनी तहसील कार्यालय जिंतूर येथे निवेदन सादर केले. निवेदनाची प्रत पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन जिंतूर यांनाही देण्यात आली आहे.

आता तहसील प्रशासन या प्रकरणाची पाहणी करून शेतकऱ्यांचा दोन वर्षांपासून प्रलंबित असलेला शेतरस्त्याचा प्रश्न तातडीने सोडवणार का, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



## थोडक्यात बातम्या

## शिळ-डायघर पोलिसांची दमदार कामगिरी; २१२ हरवलेले मोबाईल शोधून मूळ मालकांना परत



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३१, शिळफाटा (ठाणे) :** मोबाईल हरवणे किंवा चोरी होणे ही नागरिकांसाठी मोठी डोकेदुखी असते. मात्र शिळ-डायघर पोलीस ठाण्याने या बाबतीत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पौळ यांच्या मार्गदर्शनाखाली शिळ-डायघर पोलीस ठाण्याच्या टीमने गेल्या दीड वर्षात २१२ महागडे मोबाईल फोन शोधून ते तक्रारदारांना परत केले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२५ या वर्षात सुमारे १५० नागरिकांचे हरवलेले व चोरी गेलेले मोबाईल CEIR पोर्टल आणि तांत्रिक तपासाच्या आधारे शोधून परत करण्यात आले. तर सन २०२६ मध्ये आतापर्यंत ६२ मोबाईल परत करण्यात पोलिसांना यश आले आहे. म ोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी शिळ-डायघर पोलीस ठाण्याचे आभार मानले आहेत. हरवलेले मोबाईल शोधून देण्याची मोहीम यापुढेही सुरूच राहणार असल्याचे पोलीस ठाण्याकडून सांगण्यात आले. सोशल मीडियावर फिरत असलेल्या अपुऱ्या माहितीवर विश्वास न ठेवता, वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन ही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## ४ प्रमुख मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण



**अक्षराज : राहीम कोक्कर**

**दि.३१, परभणी :** जिंतूर तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी इरशाद पाशा चाँद पाशा पिंपरीकर यांनी दिनांक ३० ऑगस्ट २०२६ पासून परभणी जिल्हाधिकारी कार्यालयासम ोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. शेतकरी, नागरिक आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांशी संबंधित चार प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.यामध्ये येलदरी व सिद्धेश्वर धरणातून कालवा काढण्यात यावा, ही प्रमुख मागणी करण्यात आली आहे. कालवा झाल्यास जिंतूर तालुक्यातील शेतीला सिंचनाचा मोठा फायदा होऊ शकतो, त्यामुळे शासनाने याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच करपरा नदीचे सरळीकरण, रुंदीकरण आणि खोलीकरण करण्यात यावे, अशी मागणी ही करण्यात आली आहे. नदीच्या विकासाचे काम झाल्यास पाण्याचा प्रवाह सुरळीत होण्यास मदत होऊन परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली आहे.

**तहसील कार्यालयातील कामकाजाबाबत ही नाराजी**


जिंतूर तहसील कार्यालयातील तहसीलदार, नायब तहसीलदार, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामकाजाबाबतही उपोषणाच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. मंडळ अधिकारी व तलाठी यांनी त्यांच्या निर्धारित मुख्यालयी राहावे, तसेच कार्यालयीन वेळेत वेळेवर उपस्थित राहावे, याबाबत सूचना देण्यात याव्यात. नियमांचे पालन न करणाऱ्या संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**खड्डेमय रस्त्यांमुळे अपघात; रस्ते दुरुस्तीची मागणी**

जिंतूर तालुक्यातील अनेक रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली असून, रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे वाहनचालक व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून अपघातांचे प्रमाणही वाढत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे तालुक्यातील खराब रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून रस्ते पक्के करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

## गणेशोत्सवासाठी शिवसेना सज्ज; माथेरानमध्ये स्वच्छता व सुविधांवर विशेष लक्ष

### नगराध्यक्ष चौधरी, खेडकर यांच्याकडून पदाधिकारी व कामगारांना सूचना



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.३१, माथेरान :** गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून माथेरानम ध्ये सर्वत्र गणेशोत्सवाच्या तयारीला वेग आला आहे. श्रावण महिन्यातील नागपंचमी, गोकुळाष्टमी आणि त्यानंतर येणारा गणेशोत्सव यामुळे शहरात सणासुदीचे वातावरण निर्माण झाले आहे. गणेशोत्सव सुरळीत, सुरक्षित आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी शिवसेनेकडून शहरातील विविध भागांमध्ये आवश्यक कामांकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

वार्ड क्रमांक १ मधील शिवसेनेचे नगरसेवक केतन रामाने यांनी आपल्या विभागातील स्वच्छता, रस्ते, पथदिवे तसेच अन्य अत्यावश्यक सुविधांची पाहणी करून कामांना गती दिली आहे. रस्त्यांवरील निसरड्या ठिकाणी ब्लिचिंग पावडर टाकणे, मच्छर प्रतिबंधक फवारणी करणे, पथदिव्यांची व्यवस्था करणे तसेच गणेश विसर्जनाच्या ठिकाणी साफसफाई करण्याच्या कामांवर विशेष भर देण्यात येत आहे. दरम्यान, शिवसेनेचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी आणि शहर प्रमुख मनोज खेडकर हे देखील माथेरानमधील विविध भागांमध्ये गणेशोत्सव सुरळीत पार पडावा यासाठी सातत्याने लक्ष देत आहेत. शहरातील स्वच्छता, रस्ते, प्रकाश व्यवस्था, विसर्जनस्थळांची तयारी आणि नागरिकांना आवश्यक सुविधा याबाबत ते पदाधिकारी तसेच कामगार वर्गाला वेळोवेळी सूचना देत आहेत. गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी आवश्यक ती कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना करण्यात आल्या आहेत.

गणेशोत्सवाच्या काळात माथेरानमध्ये नागरिकांसह पर्यटकांची ही मोठी वर्दळ राहणार असल्याने शहरातील स्वच्छता आणि मूलभूत सुविधा सुरळीत ठेवण्यावर विशेष भर दिला जात आहे. प्रशासन, पदाधिकारी आणि कामगार यांच्या समन्वयातून उत्सव काळात शहरातील व्यवस्था चांगली ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. गणेशोत्सव हा आनंदाचा आणि भक्तीचा सण आहे. नागरिकांनी हा सण उत्साहात आणि सुरक्षितपणे साजरा करावा. त्याचबरोबर प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसराची स्वच्छता राखून प्रशासनाला सहकार्य करावे. कचरा कुठेही न टाकता तो योग्य ठिकाणीच टाकावा, असे आवाहन शिवसेनेच्या वतीने करण्यात आले आहे. माथेरानमध्ये गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पदाधिकारी, नगरसेवक आणि कामगार वर्गाची धावपळ वाढली असून, उत्सव काळात नागरिकांना उत्तम सुविधा मिळाव्यात यासाठी विविध कामे युद्धपातळीवर सुरू आहेत.

## हर हर महादेव...! तिसऱ्या श्रावणी सोमवारी ढोकेश्वरला भाविकांची मांदियाळी

## महाराष्ट्राच्या विविध भागातून भाविक ढोकेश्वर चरणी

**तब्बल २२ क्विंटल साबुदाणा खिचडीचा महाप्रसाद**

श्री ढोकेश्वर यात्रेनिमित्त भाविकांसाठी टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी विशाल भंडाऱ्याच्या माध्यमातून २२ क्विंटल साबुदाणा खिचडी महाप्रसादाचे वाटपाचे आयोजन केले होते. श्रावणी सोमवार यात्रेनिमित्त ढोकेश्वरचे दर्शन झाल्यानंतर अनेक भाविकांनी ढोकेश्वर खिचडी महाप्रसादाचा लाभ घेतला. ढोकेश्वरच्या साबुदाणा खिचडीचे एक वेगळेच वैशिष्ट्य आहे. या दिवशीचा प्रसाद हा भाविकांसाठी पर्वणी आहे. दिवसभर हजारोंच्या संख्येने भाविकांनी पोटभर खिचडीचा प्रसाद देताना टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने उत्कृष्ट नियोजन व आयोजन पाहून अनेकांनी या ढोकेश्वर विशाल भंडारा कमेटीला धन्यवाद दिले.





**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, पारनेर (अहिल्यानगर) :** तिसरा श्रावणी सोमवार असल्याने पुरातन पांडवकालीन लेणी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री ढोकेश्वरला हजारो भाविकांची मांदियाळी पाहायला मिळाली. पहाटे ३ वाजता ढोकेश्वर मंदिरातील पिंडीला दही दुग्ध असा महाजलाभिषेक करून पुजा करुन म हाआरती करण्यात आली.

शिवमुठ मूग वाहण्यात आली. यानंतर डमरू व शंखनाद करत गोसावी कुटुंबाच्या वतीने विधिवत साज चढवला. पहाटेपासूनच भाविकांना दर्शनासाठी ढोकेश्वर मंदिर खुले करून देण्यात आले.

त्यामुळे भाविकांनी ढोकेश्वर महाराज श्रींचे दर्शन घेऊन मंदिर प्रदक्षिणेचा मार्ग भाविकांनी हर हर महादेव, बम बम भोलेच्या घोषणांनी मंदिर परिसर दणाणून सोडला होता. टाकळी ढोकेश्वर (ढोकी) येथे श्रावण महिन्यातील तिसऱ्या श्रावणी सोमवारी हजारोंच्या संख्येने भाविक दाखल होतात. त्यामुळे ढोकेश्वरला श्रावण महिन्यात विशेष महत्त्व असते. श्रावण महिना सुरू झाल्यापासून दररोज शेकडो भाविकांची श्री क्षेत्र ढोकेश्वर येथे गर्दी पाहायला मिळाली. ह्या तीन दिवसांम ध्ये हजारो भाविकांनी पवित्र अशा पिंडीचे दर्शन घेतले.

या श्रावणमासात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेमध्ये विविध खेळणी, पाळणाघरे, खाऊची दुकाने, संसारोपयोगी वस्ती खरेदी करण्यासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. तिसऱ्या श्रावणी सोमवार व त्यामध्ये रक्षाबंधन हा सण जोडून आल्यामुळे दिवसभर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्तांनी तसेच पाहुणेरावळ्यांनी हजेरी लावली होती. यात्रेनिमित्त ढोकी ग्रामस्थांच्या वतीने जंगी हगामा भरविण्यात आला होता. कुस्त्यांच्या आखाड्याने श्री ढोकेश्वर महाराजांच्या यात्रेची सांगता झाली.

## दिव्यात मनसेची ताकद वाढली; ६५० हून अधिक नागरिकांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत पक्षप्रवेश

### नागरिकांनी स्वत:हून ऑनलाइन नोंदणी करत मनसेसोबत काम करण्याची व्यक्त केली इच्छा



**अक्षराज विनोद वास्कर**

**दि.३१, दिवा (ठाणे) :** दिवा शहरात रविवार, दिनांक ३० ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने भव्य पक्ष प्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात दिवा शहरातील ६५० पेक्षा अधिक नागरिकांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत जाहीर प्रवेश केला.

मनसे नेते, माजी आमदार प्रमोद (राजू) रतन पाटील यांच्या हस्ते या सर्व नागरिकांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत प्रवेश देण्यात आला.

या पक्ष प्रवेश सोहळ्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे या नागरिकांनी कोणत्याही दबावाशिवाय स्वत:हून ऑनलाइन नोंदणी करून मनसेमध्ये काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती. दिवा शहर मनसेच्या वतीने दिव्यातील नागरिकांना महाराष्ट्र नवनिम ाण सेनेसोबत काम करण्याची इच्छा असल्यास ऑनलाइन लिंकच्या माध्यम ातून नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला दिवेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने आपली नोंदणी केली.

अवघ्या काही दिवसांत ६५० पेक्षा अधिक नागरिकांनी ऑनलाइन नोंदणी करून मनसेमध्ये प्रवेश घेण्याची इच्छा व्यक्त केली, हे दिवा शहरातील नागरिकांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या विचारांवरील वाढता विश्वास अधोरेखित करणारे आहे.

दिवा शहरातील सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न, स्थानिक समस्या, मूलभूत सुविधा, मराठी माणसाचे हक्क आणि दिव्याच्या विकासासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना सातत्याने आक्रमकपणे काम करत आहे. या कामाची दखल घेत नागरिक स्वत:हून मनसेशी जोडले जात असल्याचे या पक्ष प्रवेश सोहळ्यातून स्पष्ट झाले आहे.

यावेळी पक्षात प्रवेश केलेल्या सर्व नवीन महाराष्ट्र सैनिकांचे मनसे नेते प्रमोद (राजू) रतन पाटील यांनी स्वागत केले. तसेच येणाऱ्या काळात दिवा शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी संघटितपणे काम करण्याचे आवाहन करण्यात आले. ६५० हून अधिक नागरिकांचा स्वत:हून पक्षप्रवेश हा केवळ आकडा नसून दिवा शहरातील नागरिकांचा महाराष्ट्र नवनिम ाण सेनेवरील वाढता विश्वास आणि बदलाची इच्छा दर्शविणारा जनतेचा कौल आहे, अशी भावना यावेळी म नसेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## जालना अत्याचार प्रकरण; बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांवर ॲट्रॉसिटी दाखल करून तत्काळ अटक करा

## नागपूर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३१, नागपूर :** जालना जिल्ह्यातील दलित समाजातील शेतकरी परमेश्वर हिवाळे यांना बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी अमानुषपणे मारहाण करून त्यांच्या तोंडात बळजबरीने शेण घातल्याची घटना ३१ ऑगस्टला घडली असून या विकृत कृत्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित करण्यात आला. या घटनेचे तीव्र पडसाद नागपुर जिल्ह्यात उमटले असून प्रकरणातील दोषींवर तत्काळ अनुसूचित जाती-जमीन अत्याचार प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना तत्काळ अटक करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात असून कोराडी पोलीस स्टेशन मार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात इशारा देण्यात आला आहे की, दलित समाजावर होणारे असे अमानुष अत्याचार खपवून घेतले जाणार नाहीत. पीडित परमेश्वर हिवाळे यांना त्वरित न्याय न मिळाल्यास आणि आरोपींवर कडक कारवाई न झाल्यास राज्यभरात तीव्र आंदोलन छेडले जाईल. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या सर्व परिस्थितीची आणि कायदा - सुव्यवस्थेच्या प्रश्नाची संपूर्ण जबाबदारी गृह विभाग व राज्य शासनाची राहील असा स्पष्ट इशारा महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाचे सचिव रत्नदीप रंगारी यांनी दिला आहे. यावेळी अभि बन्सोड, शरद मेश्राम, शंकर छत्री, निखिल गवंदे, विनीत मेंढे, गणेश शेंडे आदी उपस्थित होते. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट पसरली असून दोषी कार्यकर्त्यांवर लवकरात लवकर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

## महात्मा ज्योतिबा फुले पतसंस्थेतर्फे गुणवंतांचा सत्कार



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथील महात्मा ज्योतिबा फुले नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने स्थानिक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या प्रांगणात वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ३० ऑगस्ट रोजी पार पडली. यावेळी संस्थेच्या सदस्यांच्या पाल्यांनी दहावी व बारावी परीक्षेत गुणवत्ता सिद्ध केली. या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रम ाणपत्र व रोख पुरस्कार प्रदान करून सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा ज्योतिबा फुले नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश पंदीलवार होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा सहकारी प्रशिक्षण अधिकारी एन.डी.पिंपळशेंडे, संस्थेचे उपाध्यक्ष सुधाकर वडस्कर, संचालक प्रभाकर टोंगे, शंकर गिरडकर, भीमराव पाझारे, विजय गिरडकर, अनंतसुग्रीव वानखेडे यांची उपस्थिती होती.

यावेळी दहावीतील गुणवंत विद्यार्थी नैतिक महेश तुराणकर, हर्ष सुनील चौधरी, आयुष विजय वैरागडे, बारावीचे अमुल्या भास्कर कांबळे, हंसिका राजकुम ार डाहुले व निरज बाळा वडस्कर यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह, रोख रक्कम प्रदान करून मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करून सत्कार करण्यात आले. दरम्यान सर्वसाधारण सभेत विषयसूचीनुसार विविध विषयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले.

यावेळी एन.डी.पिंपळशेंडे यांनी सहकारी पतसंस्था सभासदांच्या बळावर प्रगती करीत आहे. उचल केलेल्या कर्जाची वेळेत परतफेड केल्यावरच संस्थेची वाटचाल सुकर होईल, असे उपस्थितीतांना सांगितले. प्रास्ताविक उपाध्यक्ष सुधाकर वडस्कर यांनी केले. संचालन संस्थेचे व्यवस्थापक प्रशांत गिरडकर यांनी केले. आभार अध्यक्ष सुरेश पंदीलवार यांनी मानले. यावेळी बहुसंख्य सभासदांची उपस्थिती होती

# खड्डेमय रस्त्याने नागरिकांचा जीव टांगणीला; दुरुस्ती न झाल्यास कांदरवाडीत ‘रास्ता रोको’

## वाघाडी–चरी पावन–दह्याळे–कांदरवाडी मार्गाची दुरवस्था; ॲड.गडग यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा





**अक्षराज : निलेश कासट**

**दि.३१, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यातील वाघाडी–चरी पावन–दह्याळे ते कांदरवाडी या सुमारे ७ ते ८ किलोमीटर लांबीच्या मुख्य रस्त्याची गेल्या दोन वर्षांपासून दुरवस्था झाली असून, सध्या पावसाळ्यात रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. ठिकठिकाणी पडलेले मोठमोठे खड्डे आणि त्यामध्ये साचलेले पाणी यामुळे वाहनचालक, विद्यार्थी, महिला, वृद्ध तसेच रुग्णांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती न केल्यास कासा–सायवन मार्गावरील कांदरवाडी वळणावर ‘रास्ता रोको’ अथवा ‘भात रोपणी’ आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते ॲड. विराज गडग यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी दिला आहे.

वाघाडी, चरी पावन, दह्याळे, कांदरवाडी आणि ओसरविरा परिसरातील नागरिकांसाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे. कासा, डहाणू, बाजारपेठ, शाळा, महाविद्यालये तसेच विविध शासकीय कार्यालयांमध्ये जाण्यासाठी नागरिकांना याच मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर करावा लागतो. मात्र, रस्त्याच्या दुरवस्थेमुळे दैनंदिन प्रवासच धोकादायक बनला आहे.

रस्त्याच्या मध्यभागी सिमेंटचा पाईप तुटल्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. पाईप तुटलेल्या ठिकाणी मोठा खड्डा निर्माण झाला असून, नागरिकांना अर्ध्या रस्त्यातून मार्ग काढत प्रवास करावा लागत आहे. पाईप पूर्णपणे तुटल्यास अथवा माती खचून वाहून गेल्यास या भागातील वाहतूकच ठप्प होण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

रस्त्याच्या खराब अवस्थेचा सर्वाधिक फटका शाळकरी विद्यार्थी, महिला, वृद्ध आणि रुग्णांना बसत आहे. ऑटो रिक्षा तसेच इको वाहनचालकांना खराब रस्त्यामुळे वाहनांचे नुकसान सहन करावे लागत असून, त्याचा परिणाम त्यांच्या व्यवसायावर आणि कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीवर होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.परिसर जंगलाने व्यापलेला असल्याने साप, विंचू यांसारख्या विषारी प्राण्यांचा धोका कायम असतो. अशा आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत रुग्णालयात पोहोचविणे अवघड होत आहे.

खराब रस्त्यामुळे गरोदर महिलांना दवाखान्यात नेताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागल्याचे स्थानिक ऑटो रिक्षाचालकांनी ॲड. विराज गडग यांना सांगितले. त्यामुळे रस्त्याची दुरुस्ती ही केवळ वाहतुकीची समस्या नसून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न बनला आहे.

रस्त्याच्या दुरवस्थेच्या पार्श्वभूमीवर कांदरवाडी येथील समाज मंदिरात ग्रामस्थांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत संबंधित प्रशासकीय अधिकारी, बांधकाम विभाग आणि लोकप्रतिनिधींना निवेदन देण्याचा निर्णय घेण्यात आला. निवेदनाद्वारे प्रशासनाला १० दिवसांची मुदत देण्यात आली असून, या कालावधीत रस्त्याची दुरुस्ती न झाल्यास ९ सप्टेंबर २०२६ रोजी आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यावेळी ॲड.विराज गडग यांनी प्रशासनाच्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त केली. या रस्त्यावरून दररोज हजारो नागरिकांची ये-जा असते. मात्र, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे संपूर्ण मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन ७ ते ८ किलोमीटर रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी त्यांनी केली. बैठकीस ग्रुप ग्रामपंचायत ओसरविरा–कांदरवाडीचे उपसरपंच जीवन पऱ्हाड, सदस्य लक्ष्मण मुहुंडकर, नरेश कोदे, राजू दळवी, चिंतामण पाटारा, कैलास सुतार, महेंद्र कोंब, हिऱ्या कोंब, रूपेश तल्हा, कृष्णा कोंब यांच्यासह चरी पावन, दह्याळे, कांदरवाडी व ओसरविरा परिसरातील शेकडो कार्यकर्ते, विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

**आंदोलनाची वेळ येऊ नये**

आता सणासुदीचे दिवस सुरू होणार आहेत. त्याआधी प्रशासनाने रस्त्याची दुरुस्ती करून दिल्यास ग्रामस्थांतर्फे प्रशासनाचे आभार मानू. कोणत्याही परिस्थितीत ग्रामस्थांवर आंदोलन करण्याची वेळ येऊ नये, असे ॲड. विराज गडग यांनी स्पष्ट केले.

प्रशासन आता या रस्त्याच्या दुरवस्थेकडे कितपत गांभीर्याने पाहते आणि प्रत्यक्ष दुरुस्तीचे काम कधी सुरू होते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पनवेल महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातील कथित अनियमिततेची चौकशी करण्याची प्रहारची मागणी

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.३१: पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांना स्वावलंबी व सशक्त बनविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमांच्या निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप प्रहार संघटनेने केला आहे. केवळ दोन दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्याचा घाट घातला जात असून, मर्जीतील संस्थेला काम देण्यासाठी नियमबाह्य पद्धतीने कार्यादेश देण्यात आल्याचा दावा संघटनेने केला आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी प्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पनवेल महापालिका आयुक्त आणि महापौर यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे.

महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांच्या व्यावसायिक व सामाजिक कौशल्यांमध्ये वाढ करण्यासाठी विविध प्रशिक्षण आणि जनजागृती कार्यक्रम राबविण्याच्या उद्देशाने डिसेंबर २०२५ मध्ये विविध संस्थांकडून बाजारभाव व दरपत्रके मागविण्यात आली होती. या प्रक्रियेत सहभागी संस्थांनी सादर केलेल्या दरांमध्ये लक्षणीय तफावत असल्याचे प्रहार संघटनेचे म्हणणे आहे. काही संस्थांनी तुलनेने कमी दर सादर केले असतानाही संबंधित संस्थेला नियमबाह्य पद्धतीने कार्यादेश देण्यात आल्याचा आरोप प्रहारने केला आहे. प्रशिक्षणाचा कालावधी केवळ दोन दिवसांचा असताना त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्याचे नियोजन करण्यात आल्याने या संपूर्ण प्रक्रियेवर संशय निर्माण होत असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

महिला सक्षमीकरणाच्या नावाखाली अल्प कालावधीच्या प्रशिक्षणासाठी अवाजवी खर्च दाखविणे, बाजारभावामध्ये कृत्रिम तफावत निर्माण करणे किंवा विशिष्ट संस्थेला अनुचित लाभ मिळवून देणे अशा बाबी घडल्या असल्यास त्या सार्वजनिक निधीच्या गैरवापराच्या आणि प्रशासकीय अनियमिततेच्या स्वरूपाच्या ठरू शकतात, असा दावा प्रहारने केला आहे.

या प्रकरणाची निष्पक्ष, स्वतंत्र आणि सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी, सल्लागार अथवा अन्य व्यक्तींचे संगनमत आहे का, याचीही चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच काही संस्थांनी कोणाच्या सूचनेनुसार किंवा दबावाखाली बाजारभाव अथवा दर सादर केले आहेत का, याचीही तपासणी करण्याची मागणी प्रहारने केली आहे. यावेळी प्रहारचे रायगड जिल्हाध्यक्ष डॉ.सुनील शिरीषकर, प्रहार विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज टेकाडे, कोकण संपर्क प्रमुख ॲड.अजय तापकीर, अजय कदम, अभिनव येलवे, राहुल तेलंग, पंकज मोहिते आदी पदाधिकारी उपस्थित होते.



**दोषींवर कारवाईची मागणी**

पालिका वर्तुळात अनेक चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर दबाव टाकून नियमबाह्य पद्धतीने कामे करून जनतेच्या पैशांची उधळपट्टी करण्याची स्पर्धा सुरू असल्याची चर्चा आहे. ही बाब गंभीर असून, महापालिका आयुक्त आणि महापौरांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी. तसेच संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी प्रहार संघटनेने केली आहे.

या प्रकरणात महापालिका प्रशासनाने तत्काळ कारवाई न केल्यास प्रहार संघटनेच्या वतीने आक्रमक भूमिका घेण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे. दरम्यान, या आरोपांबाबत पनवेल महानगरपालिका प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नसून, चौकशीनंतरच या आरोपांमध्ये तथ्य किती आहे हे स्पष्ट होणार आहे.

# आ. मुनगंटीवार यांच्या विकासदृष्टीला कृतज्ञतेची अनोखी भेट

## ‘मन की बात’ कार्यक्रमामध्ये अरविंद वर्मा यांची काव्यमय मानवंदना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, बल्लारपूर (चंद्रपूर) :** लोकप्रतिनिधीच्या कार्याचा खरा परिणाम हा जनतेच्या मनात उमटलेल्या विश्वासातून दिसून येतो. महाराष्ट्राच्या विकासाचा ध्यास घेत, समाजातील शेवटच्या घटकाच्या हिताची जाणीव ठेवून सातत्याने कार्य करणाऱ्या आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या विकासदृष्टीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भाजपा युवा मोर्चा, बल्लारपूर शहरचे महामंत्री श्री. अरविंद चुनबाद वर्मा यांनी ‘मन की बात’ कार्यक्रमात आ. मुनगंटीवार यांना त्यांच्या कार्याचा गौरव करणारी विशेष काव्यरूप फ्रेम भेट दिली.

आ. सुधीर मुनगंटीवार यांचे सार्वजनिक जीवन हे विकास आणि संवेदनशीलतेच्या सुंदर संगमाचे उदाहरण आहे.



अर्थमंत्री म्हणून कार्यरत असताना त्यांनी पर्यावरण संवर्धनाला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप देत ५० कोटी वृक्षलागवडीचा संकल्प साकारला. या अभूतपूर्व उपक्रमाची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली. विकास करताना भविष्यातील पिढ्यांचा विचार करणारी त्यांची ही दूरदृष्टी आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या कार्यातील संवेदनशीलता अधोरेखित करणारी आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्यासाठी विकास म्हणजे केवळ भौतिक प्रगती नव्हे; तर माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणे होय. म्हणूनच त्यांच्या कामात कधी पर्यावरणाची काळजी दिसते, कधी सामान्य रुग्णाच्या आरोग्याची चिंता दिसते, कधी मुलांच्या शिक्षणाची आस्था दिसते, तर कधी शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठीची तळमळ जाणवते.श्री. अरविंद चुनबाद वर्मा यांनी दिलेल्या या फ्रेममध्येही याच भावनेचे प्रतिबिंब उमटले आहे.

यह साधारण केवल नाम नही, किसी कुर्सी के मोहताज नहीं अशा शब्दांत त्यांनी आ. मुनगंटीवार यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि कार्याचे केलेले काव्यात्मक वर्णन हे एका कार्यकर्त्याच्या मनातील कृतज्ञतेचा भाव व्यक्त करणारे ठरले.

विकासासाठी असलेली तळमळ, जनतेच्या सुख-दुःखाची जाण आणि महाराष्ट्राला पुढे नेण्याची दूरदृष्टी यामुळेच आ. सुधीर मुनगंटीवार हे विकासाला संवेदनशीलतेची दिशा देणारे नेतृत्व म्हणून जनमानसात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे ठरले आहेत. त्यांच्याप्रती व्यक्त करण्यात आलेली ही भेट म्हणजे त्यांच्या कार्याला मिळालेली एका नागरिकाच्या हृदयातून उमटलेली कृतज्ञतेची पावती आहे.

## थोडक्यात बातम्या

# राष्ट्रवादीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सुभाष लोंढे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, पारनेर (अहिल्यानगर) :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी जिल्हा अध्यक्ष अशोकराव सावंत उपस्थित होते.

सुभाष लोंढे हे मंत्री छगन भुजबळ यांचे निकटवर्तीय मानले जातात लोंढे यांनी यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात ओबीसी जिल्हाध्यक्ष व ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष ही पदे भूषविलेली आहेत.

या नियुक्ती बद्दल राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा कॅबिनेट मंत्री छगनराव भुजबळ, नगर शहराचे आमदार संग्राम जगताप, पारनेर तालुक्याचे आमदार काशीनाथ दाते, माजी खासदार समीर भुजबळ, आमदार पंकज भुजबळ, बापूसाहेब भुजबळ, माजी जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत गायकवाड, प्रा.माणिकराव विधाते, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, जिल्हा महिला उपाध्यक्षा सुधामतीताई कवाद, महिला तालुका अध्यक्षा सुषमाताई रावडे, युवक अध्यक्ष भास्कर उचाळे, युवती अध्यक्षा अपर्णा ताई खामकर यांनी अभिनंदन केले आहे.

# शिरपूर विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

## तब्बल ३२ हजार मतदारांवर होणार सुनावणी, ४ नवीन मतदान केंद्रांची भर




**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.३१, शिरपूर (धुळे) :** शिरपूर भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार शिरपूर विधानसभा मतदारसंघाची विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (एसआयआर) अंतर्गत प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या नव्या यादीनुसार शिरपूर मतदारसंघातील एकूण मतदार संख्या ३ लाख ७ हजार २३६ इतकी झाली असून, तब्बल ३२ हजार ६०२ मतदारांवर सुनावणी घेतली जाणार असल्याची माहिती मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक यांनी दिली आहे.

**३२ हजार मतदारांवर सुनावणी**

प्रसिद्ध करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, यापूर्वी शिरपूर मतदारसंघात एकूण ३ लाख ५१ हजार १८६ मतदार होते.यात पुरुष १ लाख ७६ हजार २७२ तर महिला १ लाख ७४ हजार ९०८ व तृतीयपंथी ६ एवढी मतदार संख्या होती. मात्र, नवीन प्रारूप यादीनुसार ही संख्या ३ लाख ७ हजार २३६ यात पुरुष १ लाख ५६ हजार ३८८ व महिला १ लाख ५० हजार ८४२ तर तृतीयपंथी ६ इतकी मतदार संख्या राहिली आहे.

मतदार यादीतील विसंगती असलेल्या मतदारांची संख्या १८ हजार ४६४ तर मॅपिंग न झालेल्या मतदारांची संख्या १४ हजार १३८ आहे. त्यामुळे एकूण ३२ हजार ६०२ मतदारांवर प्रशासनाकडून सुनावणी घेतली जाणार आहे.

**४ नवीन मतदान केंद्रांची वाढ**

मतदारसंघातील मतदान केंद्रांच्या संख्येतही वाढ करण्यात आली आहे. पूर्वी ३३६ मतदान केंद्रे होती, ती आता ३४० झाली आहेत. नव्याने तयार करण्यात आलेल्या ४ मतदान केंद्रांमध्ये मतदान खाऱ्यादोंडवाडा, आंबाफाटा, नवी सांगवी आणि सावेर येथील मतदान केंद्रांचा समावेश करण्यात आला आहे.

**पुनर्निरीक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक**

दिनांक ३१ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदान यादी प्रसिद्ध करण्यात आली.आता यावर दावे व हरकती ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर पर्यंत स्वीकारण्यात येतील.तर

दावे व हरकतींवर नोटीस देणे व सुनावणी घेण्यासाठी ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर कालावधी देण्यात आला आहे. आणि

**अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर रोजी जाहीर करण्यात येणार आहे.**

नागरिकांनी या प्रारूप यादीत आपली नावे तपासून घ्यावीत आणि काही दावे व हरकती असल्यास ३० सप्टेंबरपर्यंत नोंदवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रक्रियेनंतर ४ नोव्हेंबर रोजी शिरपूर मतदारसंघाची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. यावेळी उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक, तहसीलदार महेंद्र माळी यांच्या उपस्थितीत नवीन तहसील कार्यालय येथे प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली.

# पत्रकार सुनील क्षीरसागरांच्या निवासस्थानी सोरटी सोमनाथाची पारंपरिक पद्धतीने विधीवत पूजा संपन्न



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३१,विंचूर (नाशिक) :** पवित्र श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारचे औचित्य साधून विंचूर येथील पत्रकार सुनील क्षीरसागर आणि क्षीरसागर कुटुंबीयांच्या वतीने सोरटी सोमनाथाची पारंपरिक पद्धतीने विधीवत पूजा, रुद्राभिषेक व आरती उत्साहात संपन्न झाली.सकाळी शुचिर्भुत होऊन क्षीरसागर कुटुंबात पूजेची तयारी करण्यात आली. लाकडी पाटावर वाळूची शिवलिंग (पिंड) तयार करून त्यावर तांब्याच्या गडव्यात पाच प्रकारची पत्री, लोहळा, विड्याची पाने व फुले यांची प्रत्येकी पाच पाने घेऊन अतिशय आकर्षक रचना करण्यात आली. मनमोहक पुष्पसजावट, विद्युत रोषणाई आणि पारंपरिक ‘ठमाचा दिवा’ प्रज्वलित करून वातावरण भक्तिमय करण्यात आले होते.

क्षीरसागर कुटुंबात चालत आलेल्या परंपरेनुसार, महादेवाला पुरण–वरणाचा नैवेद्य अर्पण करून विधिवत रुद्राभिषेक व महाआरती करण्यात आली. काशाच्या ताटात पूर्ण पाणी भरून, त्या पाण्यात संपूर्ण पूजेचे प्रतिबिंब स्पष्ट दिसेल अशा पद्धतीने मांडणी करण्यात आली.दर्शनासाठी येणारे भाविक व कुटुंबीय या पाण्यात गव्हाचे दोन–दोन दाणे अर्पण करून महादेवाच्या प्रतिबिंबाचे दर्शन घेतात; ही अनोखी परंपरा यंदाही भावपूर्ण वातावरणात पार पडली. या पूजेनिमित्त रात्री उशिरापर्यंत भजनांचा व भक्तीचा जागर करण्यात आला. या धार्मिक सोहळ्यास क्षीरसागर कुटुंबीय व आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.